देशोन्नती

# शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात सायबर सुरक्षा जागरूकता अभियान!

## ▶▶ कार्यक्रमात १९३ विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग ▶▶ दीड हजार नागरिकांनी घेतली सायबर सुरक्षेची माहिती

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला** ▪ स्थानिक शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात राष्ट्रीय सायबर सुरक्षा याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले होते. याकरिता महाराष्ट्र सायबर सेल मुंबई, क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि नासकॉम फाउंडेशन यांचा सहयोग प्राप्त झाला. यावेळी आयोजित पोस्टर्स स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. जगदीश साबू, अकोला सायबर सेलचे आशिष आमले, राहुल देवीकर यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेमध्ये १९३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आणि ९० पोस्टर्स तयार करून प्रेझेंटेशन्स दिले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. नितीन सुरडकर, प्रा. रवी रेवस्कर यांनी केले.



पोस्टर्स स्पर्धेमध्ये दिवसभरात मोहरीदेवी खंडेलवाल, भिकमचंद खंडेलवाल, खंडेलवाल इंग्लिश स्कूल व इतर १५०० पेक्षा जास्त प्रेक्षकांनी भेट देऊन सायबर सुरक्षेविषयी महत्त्वाची माहिती करून घेतली. स्पर्धेदरम्यान शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष डॉ. तारा हातवळणे, सचिव गोपाल खंडेलवाल यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले. क्विक हिल मार्गदर्शिकेचे डाउनलोड करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी समन्वयक शीतल साखरे तथा सायबर वॉरियर्स यांनी राष्ट्रीय सायबर सुरक्षा जागृती महिना साजरा करण्यास उत्साहात सुरुवात केली. सायबर सुरक्षा जनजागृती अभियानचे समन्वयक डॉ. हरिदास खरात यांनी विविध उपक्रमाची माहिती दिली.

### ३५ हजार विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे!

जिल्ह्यातील अनेक शाळेमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती अभियान राबविण्यात आले असून, यावर्षीदेखील ३ हजार ५०० विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे असे सांगितले. अभियानांतर्गत क्विक हिल फाउंडेशनच्या सुगंधा दानी, अकोला सायबर सेलचे प्रशांत केदारे, स्वप्निल दामोधर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन २२ सायबर वॉरियर्सची निवड करण्यात आली आहे. हे वारियर्स विविध ठिकाणी जाऊन विविध माध्यमाद्वारे सायबर सुरक्षा जागृतीचे कार्य करणार आहेत. अभियान यशस्वी करण्याकरिता प्राचार्य डॉ. जगदीश साबू, समन्वयक डॉ. हरिदास खरात त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्व शिक्षक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.